# निशाण क्र.१०८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ नुसार निशाण क्र.९९ वरील आदेशाचे पुनर्विलोकन करणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ चे आजोबा म्हणजेच गिरजाबाई शंकर राणे यांचे पती कै. शंकर मुकुंद राणे हे दि. ११ सप्टेंबर १९५९ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी मयत झाले. दावा मिळकतीतील झाडे ही सुमारे ४५ ते ५० वर्षे जुनी आहेत. म्हणजेच कै. शंकर मुकुंद राणे यांच्या मृत्यु नंतरची आहेत. दावा मिळकतीतील तोड झालेल्या झाडांशी कै. शंकर मुकुंद राणे यांचा कोणत्याही त—हेचा संबंध राहत नाही. तोड झालेली झाडे ही सामाईक नाहीत. कै. गिरजाबाई शंकर राणे हिने सुमारे १९६५ च्या सुमारास स्वकष्टाने झाडांची लागवड केलेली असून गुरांपासून व वन्य प्राण्यांपासून त्या झाडांचे संरक्षण केले आहे. सबब, सदर दावा मिळकत ही कै. गिरजाबाई शंकर राणे हिने स्वकष्टाने उभी केलेली असून त्या तोड झालेल्या दावा मिळकतीशी कै. शंकर मुकुंद राणे यांचा काहीही संबंध नाही. म्हणजेच तोड झालेली दावा मिळकत ही कै. गिरजाबाई शंकर राणे हिने स्वकष्टाने उभी केलेली तिची स्वत:ची मिळकत आहे, ती समाईक म्हणता येणार नाही. कै. गिरजाबाई शंकर राणे हिने स्वकष्टाने उभी केलेली स्वत:ची मिळकत ही तिची वृध्द्‌ापकाळात काळजी घेणारी व तिला आर्थिक व वैद्यकीय मदत करणा—या व्यक्तीला विना मोबदला बक्षिसपत्राने देण्याचा तिला पुर्ण नैतिक अधिकार आहे, मग ती व्यक्ती कै. गिरजाबाई शंकर राणे हिच्या नात्यातील असो अगर नसो, शेवटी वृध्द्‌ व्यक्तीची काळजी घेणे तिला आर्थिक व वैद्यकीय मदत करणे हे न्याय संगत आहे. वादी यांना जर असे वाटत असेल की तोड झालेली दावा मिळकत ही कै. शंकर मुकुंद राणे यांनी केलेली लागवड आहे, म्हणजेच तोड झालेली झाडे ही सुमारे ६० वर्षे जुनी आहेत तर त्यांनी ते सिध्द्‌ करावे. या सर्व कारणास्तव निशाण क्र.९९ वरील आदेशाचे

पुनर्विलोकन करणेची विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे सादर केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार अर्ज खोटा व खोडसाळ असून फेटाळण्यास पात्र आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी याने केवळ वेळ काढणेसाठी दिला आहे. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादी, प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला

४. नि.क्र.८० वर झालेल्या आदेशाबाबत पुनर्विचार करणेबाबत प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.९९ ला अर्ज दिला होता. सदरचा अर्ज गुणावगुणावर नामंजूर करण्यात आला आहे. नि.क्र.९९ वर झालेल्या आदेशाबाबत पुनर्विलोकन करण्यात यावे यासाठी प्रतिवादी क्र.१ याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ नुसार हा अर्ज दाखल केला आहे. नि.क्र. ८० वर झालेल्या आदेशाबाबत पुनर्विचार करण्याच्या अर्जावर झालेल्या आदेशाबाबत पुनर्विलोकन करण्याचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ या तरतूदीनुसार मंजूर करता येईल असे मला वाटत नाही.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ नुसार आदेशामध्ये काही दोष असल्यास किंवा त्या अर्जाच्या सुनावणीनंतर नवीन व महत्वाची बाब किंवा पुरावा आढळून आल्यास सदर आदेशाबाबत पुनर्विलोकन करता येते. मात्र, नि.क्र.९९ च्या आदेशामध्ये अशा प्रकारचा कोणताही दोष असल्याचे दिसून येत नाही किंवा नि.क्र.९९ च्या आदेशाच्या अनुषंगाने एखादी नवीन व महत्वाची बाब किंवा पुरावा नंतर मिळून आल्याचे दिसून येत नाही. दावा मिळकतीमधील झाडे गिरजाबाईने स्वकष्टाने लावली होती ही बाब नि.क्र.९९ च्या पुनर्विचाराच्या अर्जासंबंधी महत्वाची बाब आहे असे वाटत नाही. त्यामुळे

प्रतिवादी क्र.१ ने नमूद केलेल्या कारणास्तव नि.क्र.९९ वरील आदेशाचे पुनर्विलोकन करता येणार नाही असे मला वाटते.

६. वरील सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज फेटाळणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक ११/०४/२०१८